MHSN130006922020

**नियमित दिवाणी मुकदमा क्र. १७८/२०२०**
**निशाणी क्र. ५ वरील आदेश**
**(लक्ष्मण पाटील  वि. दिनकर पाटील वगैरे)**

प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादी क्रमांक १ व ६ यांचेविरूध्द दिवाणी प्रक्रिया संहिता  आदेश ३९ नियम १ व २ अन्वये दाव्याच्या अंतीम निकालापावेतो तुर्तातुर्त ताकीद मिळणेकरीता दाखल केला आहे.

२.	वादी यांच्या कथनाप्रमाणे मौजे कान्हारवाडी, ता. कडेगांव, जि. सांगली येथील गट नं.२२०, २२२, २१९, २११ व ३४५ अशा प्रकारे अर्ज कलम १ मध्ये विस्तृतपणे नमुद केलेल्या मिळकती या दावा मिळकती असून सदर अर्जामध्ये दावा मिळकत असे संबोधले आहे. वादीने दावा कलम २ मध्ये वंशावळ दिली आहे.

३.	दावा मिळकती या मुळच्या वादी व प्रतिवादी यांच्या वडिलार्जित मिळकती आहेत. दावा मिळकतीचे वाटप वादी यांचे पुर्वहक्कदार मयत विष्णु व प्रतिवादी यांचे पुर्वहक्कदार मयत जयवंत व विक्रम यांच्यामध्ये झाले आहे. दावा मिळकतीमधील १/२  हिस्सा वादी व प्रतिवादी नं. १० यांचे पूर्वहक्कदार यांना व राहिलेला हिस्सा मयत जयवंत व मयत विक्रम यांना प्रत्येकी १/४ हिश्श्याने वाटणीस आला. अशा प्रकारे वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये सरसनिरस मानाने वाटप झालेले होते व आहे. तशी ७/१२ रेकॉर्डला नोंद आहे. परंतु अलिकडेच प्रतिवादीने वादीच्या हिश्यामध्ये दांडगाईने अतिक्रमण करून कब्जा करण्याचा प्रयत्न गेल्या ६–७ महिन्यापासुन सुरू केला आहे. त्यामुळे प्रस्तुतचे कामी वादी यांनी दावा मिळकतीत अतिक्रमण करू नये तसेच, वादी यांचे कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये अशी प्रतिवादी क्र.१ ते ६ विरुध्द तुर्तातुर्त मनाई मागितली आहे.

४.	प्रतिवादी क्र.१ याने निशाण ३२ वर आपले म्हणणे दाखल करून अर्जातील सर्व कथने नाकारली आहेत. दावा मिळकती व्यतिरिक्त इतर मिळकती ही वादी यांनी जाणीवपुर्वक व हेतुपुरस्पर या दाव्यामध्ये सामील केलेल्या नाहीत. तसेच,

वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये असलेल्या वडिलार्जित शेतजमिन आणि घर मिळकतींचे प्रतवारी नुसार सरसनिरसमानाने कमी–जास्त प्रमाणात सन १९६६ मध्ये तोंडी वाटप झालेले आहे. त्याप्रमाणे, वादी व प्रतिवादी यांची सोयी व गरजेप्रमाणे वहिवाट आहे. परंतु सदर वाटपाप्रमाणे प्राप्त झालेल्या क्षेत्रानुसार हिश्यांचे ७/१२ रेकॉर्ड सदरी नोंद झालेली नव्हती. परंतु वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये पूर्वी झालेल्या वाटपाप्रमाणे त्यांची स्वतंत्रपणे व शांततामय वहिवाट होती व आहे.

५. सदरचे कामी प्रतिवादी क्र.६ यांना नोटीस मिळुनही गैरहजर राहिल्यामुळे त्यांच्या विरुध्द सदरचा अर्ज म्हणणे नसता चालविणेचा आदेश पारीत केलेला आहे.

६. वादी यांच्या अर्जातील कथनांवरुन खालील मुद्दे विचारार्थ असुन त्यांचे निष्कर्ष मी कारणांसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादीस सकृतदर्शनी केस आहे का? | होय. |
| २. | न्यायाचे व सोयीचे समतोलत्व कोणाच्या बाजूने आहे ? | वादीचे |
| ३. | तुर्तातुर्त मनाई अर्ज नामंजुर झाल्यास कशानेही न भरुन येणारे असे नुकसान कोणाचे होईल ? | वादीचे |
| ४. | काय आदेश ? | नि. ५ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |

## <u>कारणमिमांसा</u>

७. वादीने खालील कागदोपत्री पुरावा दाखल केला आहे.

| अ.क्र. | कागदपत्र | निशाणी |
|---|---|---|
| १. | मौजे कान्हारवाडी ता.कडेगांव, जि.सांगली येथील दावा मिळकतीचे ७/१२ चे उतारे | ८ ते १२, ६२/२ ते ६ |

| | | |
|---|---|---|
| २. | वादी यांना दाखल केलेला एन.सी.आर. | ५९/१ |
| ३. | फोटो | ५९/२ व ३,<br>६२/१ |
| ४. | प्रतिवादी यांना दाखल केलेला एन.सी.आर. | ६४/१ |
| ५. | दावा मिळतीचे गट नकाशे | ६६/१ ते ४ |
| ६. | दावा मिळतीचे खाते व ७/१२ उतारे | ७०/१ ते ३ |

८. वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. पी. एस. जाधव व प्रतिवादी क्र.१ तर्फे जे. पी. शिंदे यांचा युक्तीवाद ऐकला.

**मुद्दा क्र. १ करीता**

९. सदर मुद्दयासंदर्भात वादीस या अर्जाची कामी सकृतदर्शीनी केस आहे का ? हे पाहत असताना सकृतदर्शनी प्रतिवादी क्र.१ व ६ यांनी वादी यांच्या मिळकतीत अतिक्रमण करून त्यांच्या वहिवाटीस हरकत अडथळा केला आहे का? हे पाहणे आवश्यक आहे.

१०. वादी यांचे विधिज्ञ यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये असे कथन केले आहे की, दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या वडीलार्जित हिंदु एकत्र कुटूंबाच्या व मालकीहक्काच्या मिळकती आहेत. वादी व प्रतिवादी यांचे पुर्वहक्कदार यांच्यामध्ये सरसनिरसमानाने वाटप झालेले होते व त्याप्रमाणे दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी नोंद आहे.

११. याउलट, प्रतिवादी यांच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, वादी यांनी जाणीवपुर्वक व हेतुपुरस्पर काही वडिलार्जित शेत जमिनी मिळकती या दाव्यात सामील केलेल्या नाहीत. तसेच, वडिलार्जित शेतजमिन व घरमिळकतींचे प्रतवारी नुसार सरसनिरसमानाने कमी–जास्त प्रमाणात सन १९६० मध्ये तोंडी वाटप झालेले होते व आहे. तेव्हापासून वादी व प्रतिवादी सोयी व गरजेप्रमाणे वहिवाट करत आहेत. पुर्वी

झालेल्या वाटपाची ७/१२ पत्रकी नोंदी झालेल्या नाहीत.

१२. वादी व प्रतिवादी यांच्या कथनावरून पुर्वी त्यांच्यामध्ये वाटप झालेले आहे असे प्रथमदर्शनी दिसुन येते. सदर वाटपाप्रमाणे ७/१२ पत्रकी नोंद झालेली आहे किंवा कसे हे पाहणे गरजेचे आहे. अभिलेखावर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता, ७/१२ उताऱ्यावर वादी व प्रतिवादी यांच्या नावाच्या नोंदी दिसुन येतात. परंतु, सदरच्या नोंदी कोणत्या फेरफारने व कशा झाल्या याबाबत कोणताही फेरफार उतारा अभिलेखावर दाखल केलेला नाही.

१३. महाराष्ट्र महसुल अधिनियम कलम १५७ प्रमाणे महसुल अभिलेखात केलेल्या नोंदींना अनुमानित महत्व व त्याबरोबर असतात. सदरचे अनुमान हे खंडनगृहीत आहे. या वस्तुस्थितीची मला जाणीव आहे. सदरचा मुद्दा नाकारण्यासाठी प्रतिवादी यांनी त्यांचे खरेदीपत्र, ७/१२ उतारा, नकाशा व फोटो यांचा आधार घेतलेला आहे. सदरचा पुरावा वरील बाब खोडून काढण्यासाठी पुरेसा नाही. परंतु, दावा मिळकतींच्या ७/१२ पत्रकी नावाची व क्षेत्राची नोंद आहे यावरून प्रथमदर्शनी झालेल्या नोंदीप्रमाणे वाटप झालेले आहे, असे म्हणता येणार नाही.

१४. दावा मिळकतीमधील गट नं. २११ बाबत वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये दि.०८/०९/२०२३ रोजी हद्दीवरून, सरबांधावरील हत्तीघास व उसाचे पीक यांचे नुकसान केले म्हणुन वादी यांना प्रतिवादी यांचेविरूद्ध एन.सी.आर दाखल केल्याचे दिसुन येते. तसेच, प्रतिवादी यांनी दि.१०/१०/२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजणेच्या सुमारास कोर्टाने विरोधक यांचा अर्ज फेटाळला या कारणावरून प्रतिवादी यांना शिवीगाळ व दमदाटी करून जिवे ठार मारण्याची धमकी दिली म्हणुन दि.१२/१०/२०२३ रोजी एन.सी.आर वादी यांचे विरूद्ध दाखल केला.

१५. सदर दाव्यातील दि.१०/१०/२०२३ रोजीच्या रोजनाम्याचे अवलोकन केले असता, सदरहु दिवशी वादी हे न्यायालयात हजर होते तर प्रतिवादी गैरहजर होते. निशाण ५७ अन्वये वादी यांनी प्रतिवादी क्र. १ व ६ यांचेविरूध्द मनाई

ताकीद मिळावी म्हणुन अर्ज दाखल केला. सदरचा अर्ज प्रतिवादीचे म्हणणे येणेवर ठेवला. वादी यांनी सदरच्या कामी काही फोटो दाखल केलेले आहेत सदर फोटोंचे अवलोकन केले असता, उसपिकाचे ट्रॅक्टरच्या साहाय्याने नांगरून नुकसान केल्याचे दिसुन येते. तसेच, झाड तोडल्याचे दिसुन येते.

१६. प्रतिवादी यांनी वादी यांचे क्षेत्राबाबत कोणताही वाद उपस्थित केला नाही. प्रतिवादी यांच्या कथनाप्रमाणे प्रत्यक्ष भौगोलिक परिस्थितीवरून सरसनिरसमानाने कमी–जास्त प्रमाणात वाटप झालेले आहे. वादी व प्रतिवादी यांचे पुर्वहक्कदार यांच्यामध्ये तोंडी वाटप कशाप्रकारे झाले व कोणाला कोणते क्षेत्र, कोणत्या बाजूला दिले. याबाबी पुराव्याअंती पाहणे उचित होईल. प्रथमदर्शनी दावा मिळकतीमध्ये वादी यांचा हिस्सा असल्याचे दिसून येते.

१७. वादी करीत असलेल्या कथनावरुन प्रथमदर्शनी प्रतिवादी पिकांचे नुकसान करून हरकत अडथळा करु पाहत आहे हे सिध्द होते. कायद्याच्या तत्वानुसार एक सहहिस्सेदार अन्य सहहिस्सेदाराविरुध्द त्याच्या कब्जास हरकत करु नये अशा प्रकारची मनाई ताकीद मागू शकत नाही. परंतू सदर कारणावरुन जर अर्ज नामंजूर केला तर वादीस त्याच्या हिश्यास मिळणाऱ्या हक्कास मुकावे लागून मिळकतीतून बाहेर पडण्याची वेळ येण्याची शक्यता निर्माण होईल अशी परिस्थिती होवू शकते. तसेच वरील चर्चेवरून जर एखादा सहहिस्सेदार दुसऱ्या सहहिस्सेदाराच्या कब्जास हरकत करत असेल व पिकाचे नुकसान करत असेल तर अशा वेळी सदरचे कृत्य थांबवणे योग्य व उचित ठरते. सबब वर नमूद करणास्तव मी मुद्दा क्र. १ बाबत होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

## <u>मुद्दा क्र. २ व ३ करीता</u>

१८. सदर मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने त्याची पुर्नरावृत्ती टाळण्यासाठी एकत्रीतरित्या विचारासाठी घेतले आहेत.

१९. प्रस्तुतचे कामी न्यायाचा समोतोल वादीच्या बाजुने आहे. तसेच वादी

यांना सकृत दर्शीनी केस आहे हे स्पष्ट होते. प्रतिवादी हे दावा मिळकतीमधील पिकांचे ट्रॅक्टरच्या साहाय्याने नांगरट करून नुकसान करत असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द होते. त्यामुळे पिकाचे नुकसान थांबविणे न्यायाचे व जरूरीचे वाटते. प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब मुद्दा क्र. २ व ३ बाबत वादीच्या बाजुने निष्कर्ष नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ४ करीता**

२०. अभिलेखावर दाखल केलेले कागदपत्रे व विधीज्ञांचा युक्तीवाद या गोष्टींचा विचार करता वादीसकृत दर्शनी केस आहे असे स्पष्ट होते. तसेच न्यायाचे सोयीचे समतोलत्व व नुकसानीचे तत्व वादीच्या बाजूने असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे प्रस्तुत अर्ज खर्चासह मंजूर होण्यास पात्र आहे. सदर अर्जाच्या कामी केलेला ऊहापोह व मांडलेले निष्कर्ष या अर्जापुरतेच मर्यादित असून याकामी उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवर आधारित आहे. त्यामुळे मूळ दाव्याच्या चौकशीवेळी दोन्ही बाजूंचे पक्षकार या अर्जावरील आदेशाचा आधार घेऊ शकत नाहीत. सबब मुद्दा क्र. ४ चा निष्कर्ष दाखल खालील आदेश पारीत करत आहे.

| आदेश | |
|---|---|
| १. | अर्ज खर्चासह मंजुर करण्यात येतो. |
| २. | प्रतिवादी क्र.१ व ६ यांनी वादी यांच्या दावा मिळकतीमधील वहिवाटीस हरकत अडथळा करू नये, अशी त्यांच्या विरूद्ध तुर्तातुर्त मनाई ताकीद देण्यात येत आहे. |

CHANDRAKANT RAMCHANDRA PATIL
Digitally signed by CHANDRAKANT RAMCHANDRA PATIL
Date: 2025.01.03 17:15:46 +05'30'

**(सी. आर. पाटील)**

दि. ०३/०१/२०२५

दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कडेगांव.